निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ रुल १ व २ तसेच कलम १५१ अन्वये तात्पुरता मनाई हुकुमाकरीता केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, वादी हा मौजा तरोडा येथील रहिवासी असून शेत सर्वे क्र. ५१५ चा मालक आहे. सदर शेतजमीनीच्या उत्तरेकडे प्रतिवादी याचे शेत क्र. ४९९ असून त्यामध्ये विहीर आहे. वादीने वादातील शेत प्रतिवादी यांच्याकडून दि. २३.०६.२०१४ रोजीच्या खरेदी खताप्रमाणे खरेदी केलेले आहे. सदरचे शेत खरेदी करीत असतांना शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतून मोटर पंपाने पाणी घेवून ओलीत करण्याचा अर्धा हिस्सा खरेदी केला. सदर बाबीची नोंद महसुल अभिलेखात सुध्दा घेतलेली आहे. दि. २३.०६.२०१४ रोजीच्या खरेदी खतापासून वाद शेत क्र. ४९९ मधील विहीरीतून ओलीत करीत असून इलेक्ट्रीक कनेक्शन घेतलेले आहे. वादीच्या शेतात ओलीत करण्याचा दुसरा कोणताही साधन नाही. वादीच्या शेताचे उत्पन्न पुर्णतः प्रतिवादीच्या शेतातील विहीरीतून ओलीतावर अवलंबून आहे. शेतीच्या उत्पन्ना व्यतिरीक्त वादीकडे उत्पन्नाचे इतर कोणतेही साधन नाही. सन २०१९–२०२० मध्ये वादीने त्याच्या शेतात कापसाची बियाणे पेरले होते व त्याकरीता शेत सर्वे क्र. ४९९ मधून ओलीत केले होते. परंतु दि. ०६.१२.२०१९ रोजी प्रतिवादीने वादीला त्याच्या शेतातील विहीरीतून ओलीत करण्यास मनाई केली. त्यामुळे वादीने दि.०९.१२.२०१९ रोजी प्रतिवादीला कायदेशीर नोटीस पाठविले. त्यानंतर प्रतिवादीने वादीला त्याला शेतातून ओलीत करण्यास परवानगी दिली व त्याला कोणताही अडथळा करणार नाही असे कबूल केले. त्यामुळे सन २०१९ मध्ये वादीला शेतापासून उत्पन्न घेता आले. वादीने दि. १३.०६.२०२० रोजी त्याच्या शेतात कापसाची बियाणे पेरले. त्याच्या शेतात ओलीत करण्याकरीता प्रतिवादीच्या शेतातून पाणी घेण्यास गेले असता प्रतिवादीने त्याला ओलीताकरीता पाणी घेण्यास मनाई केली. त्यामुळे वादीला त्याचे शेत ओलीत करता आले नाही. त्यामुळे त्याने पोलीस स्टेशन तळेगाव येथे त्याबाबत तक्रार दिली. तसेच दि. ३०.०६.२०२० रोजी प्रतिवादीला

कायदेशीर नोटीस पाठविले. वादीस शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतून व इलेक्ट्रीक मोटरपंपाने पाणी घेवून त्याचे शेत ओलीत करण्याचा अधिकार आहे. परंतु प्रतिवादी कोणताही अधिकार नसतांना अडथळा निर्माण करीत आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीविरुध्द मनाई हुकुमाचा दावा दाखल केलेला आहे. वादीची सुकृतदर्शनी केस आहे. वादीला प्रतिवादीच्या शेतातील विहीरीतून मोटरपंपाने पाणी घेण्यापासून प्रतिवादीला अडथळा करण्यास मनाई हुकुम पारित न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल. सोयीचे पारडे वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे प्रतिवादीने किंवा त्याच्या तर्फे कोणत्याही व्यक्तीने वादीला शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतून वादीचा शेत क्र. ५१५ शेती ओलीत करण्यास अडथळा करु नये असा तात्पुरता मनाईचा आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी लेखी बयाण व तात्पुरता मनाई हुकुमाच्या अर्जास उत्तर नि. क्र. १६ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी वादपत्रातील कथनाचे खंडण केले आहे. प्रतिवादीचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, त्यांनी शेत क्र. ४९९ ही शेतजमीन सुरेश विठोबाजी ढबाले यांच्याकडून दि. ०५.१०.२००७ रोजी खरेदी केली. परंतु त्या शेतीमधील विहीरीचे व पाण्याचे संपुर्ण एकमेव मालक सुरेश विठोबाजी ढबाले हे कधीही नव्हते. विठोबा ढबाले हे शेत क्र. ५१५ व इतर शेत मिळकतीचे मालक होते व त्यांना भाउबंधकीचे वाटणीत मिळालेले होते. त्यातील उत्पन्नातून विठोबा ढबाले यांनी शेत क्र. ४९९ विकत घेतले व त्यामध्ये विहीर खोदली. विठोबा ढबाले यांना सुरेश ढबाले, गजानन ढबाले अशी दोन मुले असून तोंडी वाटणीमध्ये सुरेश ढबाले याला शेत क्र. ४९९ व शेत क्र. ५१५ दिले, तर गजानन ढबाले व त्यांची पत्नी सौ. रंजना ढबाले यांना शेत क्र. ४८६ व ४८७ हे शेत दिले. तोंडी वाटणीमध्ये शेत क्र. ४९९ मध्ये असलेले विहीर, त्यातील पाणी व इलेक्ट्रीक मोटरपंपामध्ये सुरेश ढबाले, गजानन ढबाले व सौ. रंजना ढबाले यांना प्रत्येकी ०.३३ पैसे नुसार हिस्सा दिला व त्यानुसार सदर हिस्से प्रमाणे तिनही व्यक्ती शेत क्र. ४९९ मध्ये विहीर व त्यातील पाण्याचे उपभोग घेत होते. गजानन ढबाले व रंजना ढबाले

यांनी प्रतिवादी व सुरेश ढबाले यांच्याविरुध्द नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०११ अन्वये दावा केला होता. सदर दाव्यात प्रतिवादी यांनी मध्यस्थांसमोर आपसी करुन गजानन ढबाले रंजना ढबाले व प्रतिवादी याला वादातील विहीरीवर ०.३३ पैसे अनुसार हक्क व अधिकार आहे असे ठरवण्यात आले.

४. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीचे वडील अरुण बबूलकर हे पारडी या गावात व आजुबाजुच्या परिसरात विना परवाना सावकाराचा व्यवसाय करतात व गरजु शेतक–यांना कर्ज देतांना अवास्तव व्याज आकारतात व त्याचा स्थावर मिळकतीचा नाममात्र खरेदी खत करुन घेतात व मुद्दल व व्याजाची रक्कम मिळाल्यानंतरच स्थावर मिळकतीची प्रत खरेदी खत कर्ज घेणा–या व्यक्तीच्या नावाने करुन देतात. प्रतिवादीचा मुलगा दिनेश याला इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरीता रुपये ५०,०००/– ची आवश्यकता असून प्रतिवादीने अरुण बबूलकर यांना रुपये ५०,०००/– ची कर्ज मागणी केली. तेव्हा त्यांनी स्थावर मिळकतीची नाममात्र खरेदी खत वादीच्या नावाने करुन द्या अशी अट ठेवली. पर्यायी नाईलाजाने प्रतिवादीने ती अट स्वीकारली व शेत क्र. ५१५ चे नाममात्र बनावट विक्रीपत्र वादीच्या नावे करुन दिले. परंतु सदर शेतीचा ताबा वादीला कधीही दिला नाही. त्याचप्रमाणे तथाकथीत विक्रीपत्रात नमुद केलेल्या मोबदल्याची रक्कम वादीने प्रतिवादीला कधीही दिलेली नाही. प्रतिवादीने डिसेंबर २०१८ पर्यंत अरुण बबूलकर यांना कर्जाची रक्कम व त्यावरील व्याजाचे वेळोवेळी नगदी पैसे देवून परतफेड केलेली आहे. तसेच अरुण बबूलकर यांच्याकडे वारंवार विक्रीपत्र खारीज करण्याकरीता व प्रतिवादीच्या खर्चाने प्रतिवादीचे नाव शेत क्र. ५१५ चे खरेदी खत ठरवल्यानुसार करुन देण्याची मागणी केली असता अरुण बबूलकर यांनी नजीकच्या भविष्यात करुन देतो असे सांगुन वेळ काढत आले आहे. दि. १५.०४.२०२० रोजी अरुण बबूलकर यांनी वादीला व्याजाची फेड दोन लाख रुपये दिल्यास प्रतिवादीचे नाव शेत क्र. ५१५ चे विक्रीपत्र करुन देवू असे सांगून अवास्तव व्याजाच्या रकमेची मागणी केली. प्रतिवादीने विरोध केल्यामुळे दि. ०७.०६.२०२० रोजी वादी व अरुण बबूलकर यांनी जोरजबरीने शेत क्र. ५१५ चा

ताबा घेतला व प्रस्तुतचा दावा दाखल करुन शेत क्र. ५१५ वर खोटा मालकी हक्क गाजविण्याचे प्रथमच सुरु केले. दि. २३.०६.२०१४ चे तथाकथीत खरेदी खत हे नाममात्र व बोगस असल्याने त्याच्या आधारावर शेत क्र. ५१५ व शेत क्र. ४९९ मधील विहीर, त्यातील पाणी व इलेक्ट्रीक मोटरपंपाच्या संदर्भात वादीला कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त होत नाही. प्रतिवादीने वादीचा अर्ज व दावा खारीज करण्याची विनंती केली.

५. वादी व प्रतिवादीचे कथन ऐकले. वादी तर्फे ॲड. टोपले यांनी युक्तीवाद केला व प्रतिवादींतर्फे ॲड. धारस्कर यांनी युक्तीवाद केला. दोन्ही पक्षाचे कथन, अभिलेखावरील दस्ताऐवज तसेच दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यापुढे खाली दिलेल्या कारणमिमांसेवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहे.

अ. क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादीची प्रथमदर्शनी केस आहे हे वादी सिध्द करतो काय ?	...नाही
२.	सोयीचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे हे वादी सिध्द करतो काय ?	... नाही
३.	तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होते काय ?	... नाही
४.	कोणता आदेश ?	.... अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

६. वादी तर्फे ॲड. टोपले यांनी युक्तीवाद केला. तसेच नि. क्र. २७ अन्वये लेखी युक्तीवाद दाखल केले. त्यांनी युक्तीवाद केला की, वादीने शेत सर्वे क्र. ५१५ ही शेत

मालमत्ता प्रतिवादीकडून दि. २३.०६.२०१४ रोजीच्या नोंदणीकृत विक्रीपत्राव्दारे खरेदी केले. सदर विक्रीपत्र त्यातील शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरी, त्यातील पाणी व इलेक्ट्रीक मोटरपंपामध्ये अर्धा हिस्सा असल्याचे नमुद केलेले आहे. त्याचप्रमाणे सातबारा उता–यात देखील त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. वादीने सदर नोंदणीला आजपर्यंत कधीही आव्हाण केलेले नाही. शेत सर्वे क्र. ४९९ च्या विहीरीतील पाणीशिवाय वादीची शेतजमीन ५१५ ची ओलीत करण्याचा वादीला इतर कोणतेही साधन नाही. वादीला शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये विहीरीतील पाणी घेण्यास अडविण्याचा प्रतिवादीला कोणताही अधिकार नाही. त्यामुळे सकृतदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे. वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकुम पारित न झाल्यास वादीला शेतीचे उत्पन्न घेता येणार नाही व त्यामुळे त्याचे अतोनात नुकसान होईल. वादी खरेदी खत केल्यापासुन सन २०१४ पासुन शेत सर्वे क्र. ५१५ च्या ताब्यात असून शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये विहीरीतील पाण्याचा व मोटरपंपाचा उपयोग करीत आहे.

७. प्रतिवादीचे वकील ॲड. पी. ए. धारस्कर यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीचा शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीवर कधीही पुर्ण हक्क नव्हता. प्रतिवादी व मुळ मालक सुरेश ढबाले यांनी गजानन ढबाले, सौ. रंजना ढबाले यांच्यासोबत सन २०१२ मध्ये संमंती पत्र केले. त्याचप्रमाणे नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०११ या दाव्यात गजानन ढबाले, सौ. रंजना ढबाले यांच्यासोबत प्रतिवादी रमेश बारई, सुरेश ढबाले यांनी तडजोड करुन वादी गजानन ढबाले व सौ. रंजना ढबाले यांचा तसेच प्रतिवादी रमेश बारई यांचा शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतील पाणी घेण्याचा प्रत्येकी १/३ अधिकार राहील असे ठरविण्यात आले. त्यामुळे प्रतिवादीचा शेत सर्वे क्र. ४९९ मधील शेत विहीरीचे संपुर्ण मालक नसतांना तो त्यातील अर्धा हिस्सा वादीला हस्तांतरीत करु शकत नाही. त्यामुळे दाव्यातील विक्रीपत्र हे खोटे व बनावटी असल्याचे सिध्द होते. त्याचप्रमाणे वादीने मुळ मालक सुरेश ढबाले यांना पक्ष केलेला नाही. प्रतिवादीने सातबारा वरील नोंदणीबाबत आक्षेप घेतला नाही त्यामुळे वादीचा हक्क कायदेशीर होत नाही. तथाकथीत विक्रीपत्र हे केवळ उसनवारीच्या व्यवहारासंदर्भात

आहे. प्रतिवादीने वादीला सदरचे शेतजमीन कधीही विक्री केलेली नाही किंवी त्याचा ताबा दिलेला नाही. सातबाराचे अवलोकन केले असता त्यामध्ये शेत सर्वे क्र. ५१५ मध्ये सोयाबीनचे पीक घेतले असल्याचे नमुद केले आहे. याउलट वादीच्या कथनाप्रमाणे त्याने कापसाचे पीक घेतले. यावरुन देखील स्पष्ट होते की, वादातील जागा ही वादीच्या ताब्यात नाही. तसेच वादीने तथाकथीत विक्रीपत्र केल्यापासुनचा सातबारा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यावरुन सुध्दा विक्रीपत्र केल्यापासून वादी शेत सर्वे क्र. ५१५ च्या ताब्यात होते हे दर्शविणारे कोणतेही दस्ताऐवज अभिलेखावर नाही. दि. २३.०६.२०१४ रोजीचे विक्रीपत्र हे खोटे व नाममात्र असल्याने त्याच्या आधारे विहीर त्यातील पाणी व मोटरपंपावर अधिकार दाखविता येणार नाही. त्यामुळे वादाचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादी तर्फे वकीलांनी विनंती केली आहे.

८. अभिलेखावरील दस्ताऐवज तसेच दोन्ही पक्षाच्या कथनाचे अवलोकन केले असता वादीच्या कथनाप्रमाणे त्यांनी शेत सर्वे क्र. ५१५ ही शेत प्रतिवादीकडून खरेदी केले असून शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये असलेले विहीर, त्यातील पाणी व मोटरपंपाचा वापर करण्याचा ५० पैसे हिस्सा त्यांनी विकत घेतला आहे. याउलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे मोबदला घेवून त्यांनी कोणतेही विक्रीपत्र करुन दिलेले नाही. याउलट त्यांनी अर्जदाराकडून ५० हजार लोन घेतले व त्या बदल्यात प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे त्याला दाव्यातील शेतीचे विक्रीपत्र करुन दिले. प्रतिवादीने मुद्दल रक्कम व त्यावरील व्याज वादीला देवून सुध्दा वादीने ठरल्याप्रमाणे त्याला परत विक्रीपत्रात करुन दिलेले नाही. तसेच प्रतिवादीचा शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीत व मोटरपंपात प्रतिवादीचे पुर्ण हक्क नाही. त्यामुळे ते वादीस ५० पैसे विहीरीत हक्क विकत देवू शकत नाही.

९. अभिलेखावरील दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता वादीने त्याच्या दाव्यासोबत शेत सर्वे क्र. ५१५ व ४९९ चा सातबारा उतारा सादर केलेला आहे. त्याचप्रमाणे २०१४ चे विक्रीपत्राची प्रमाणीत सत्यप्रत दाखल केली आहे. सदर दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता मंगेश बबूलकर यांनी श्री. रमेश बारई यांच्याकडून

शेत सर्वे क्र. ५१५ ही विकत घेतली. सदर विक्रीपत्रात शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये असलेले विहीर व इलेक्ट्रीक मोटरपंपावरील ५० पैसे हक्कासह खरेदी केले असे दि. २३.०६.२०१४ रोजीच्या विक्रीपत्रात नमुद केलेले आहे. त्याचप्रमाणे वादीने दाखल केलेला शेत सर्वे क्र. ५१५ व ४९९ च्या सातबारा उता–यात विक्रीपत्र दस्त क्र. ६७३/२०१४ नुसार शेत सर्वे क्र. ४९९ चे विहीर व मोटरपंपावर शेत सर्वे क्र. ५१५ चा ५० पैसे हक्क असे नमुद केले आहे. प्रतिवादीने वादीस वादातील विहीरीतून पाणी घेण्यास मनाई केली त्याबाबत वादीने पोलीस स्टेशन अधिकारी कारंजा, तसेच प्रतिवादी रमेश बारई यांना नोटीस पाठविले त्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे.

१०. याउलट प्रतिवादीने दाखल केलेल्या दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांनी दि. ०८.१०.२०१२ रोजीचे संमंती पत्राचा लेख दाखल केलेला आहे. सदर लेखाचे अवलोकन केले असता 'विठोबा ढबाले यांनी शेत सर्वे क्र. ४८६ ही शेतजमीन गजानन ढबाले यांना आपसी वाटणी पत्रानुसार दिलेली आहे. तसेच शेत सर्वे क्र. ४८७ ही शेतजमीन रंजनाबाई गजानन ढबाले व शेत सर्वे क्र. ४९९ ही शेतजमीन सुरेश विठोबाजी ढबाले यांना विक्रीपत्राअन्वये विकत दिलेले आहे. शेत सर्वे क्र. ४९९ ही शेतजमीन सुरेश विठोबाजी ढबाले यांच्याजवळ प्रतिवादी रमेश बाळकृष्ण बारई यांनी विकत घेतलेले आहे. सदरहु शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीवर व इलेक्ट्रीक मोटरपंपावर गजानन ढबाले, रंजना ढबाले व रमेश बारई यांचा प्रत्येकी ३३ पैसे ओलीताचा हक्क व अधिकार असल्याबाबतची नोंद सातबारामध्ये यापुर्वीच दर्ज केलेले आहे' असे संमंतीपत्रात नमुद केलेले आहे. सदर संमंती पत्रासह सन २०११ ते २०१२ चा सातबारा उतारा लावलेला असून शेत सर्वे क्र. ४९९ चा सातबारामध्ये शेत सर्वे क्र. ४८६ व ४८७ ला प्रत्येकी ३३ पैसे ओलीताचा अधिकार आहे असे नमुद केलेले आहे. तसेच शेत सर्वे क्र. ४८६ व ४८७ चा सातबारामध्ये सुध्दा शेत सर्वे क्र. ४९९ मधुन ३३ पैसे ओलीताचा अधिकार असे नमुद केलेले आहे.

११. त्याचप्रमाणे प्रतिवादीने दाखल केलेल्या तडजोडनामाचे अवलोकन केले

असता दिवाणी दावा क्र. १७/२०११ या प्रकरणात वादी गजानन विठोबाजी ढबाले व रंजना गजानन ढबाले यांनी रमेश बारई व सुरेश ढबाले यांच्याविरुध्द दावा दाखल केला होता. त्यामध्ये दोन्ही पक्षात मध्यस्थांसमोर तडजोड झाली असल्याचे दिसुन येते. सदर तडजोडीच्या अटी प्रमाणे वादी क्र. १ व २ व प्रतिवादी क्र. १ रमेश बारई यांना शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये असलेल्या विहीरीतील पाणी घेण्याचे प्रत्येकी १/३ हिस्सा ठरवण्यात आले व दि. ०८.१०.२०१२ रोजी दुय्यम निबंधक कारंजा यांच्यासमक्ष वादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र. १ यांच्यात नोंद केलेले संमतीपत्र हे वादी व प्रतिवादी यांच्यात बंधनकारक राहील असे नमुद केलेले आहे. प्रतिवादीने दाखल केलेल्या दस्ताऐवजात स्पष्ट दिसुन येते की, शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये गजानन ढबाले व रंजना ढबाले यांचा प्रत्येकी ३३ पैसे अधिकार आहे.

१२. त्याचप्रमाणे वादीने दाखल केलेल्या विक्रीपत्रासोबत जोडलेले शेत सर्वे क्र. ४९९ चा सातबारा उता–यात शेत सर्वे क्र. ४८६, ४८७ ला प्रत्येकी ३३ पैसे ओलीताचा अधिकार आहे असे नमुद केले आहे. सदर विक्रीपत्रासोबत लावलेले शेत सर्वे क्र. ५१५ चा सन २००३–२००४ ते २०१३–२०१४ च्या सातबारा उता–यात शेत सर्वे क्र. ५१५ यांना शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीत हक्क असल्याबाबत नोंद केलेली नाही. त्यामुळे सदर विक्रीपत्राच्या वेळेस वादी यांना शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये शेत सर्वे क्र. ४८६ व ४८७ यांचा प्रत्येकी ३३ पैसे ओलीताचा हक्क आहे ही बाब माहित होती असे दिसुन येते. त्याचप्रमाणे ५१५ च्या सातबा–यात शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतून ओलीताच्या हक्काबाबत कोणताही शेरा नाही हे सुध्दा माहित होते असे दिसुन येते. शेत सर्वे क्र. ४९९ चा तसेच शेत सर्वे क्र. ५१५ च्या सातबारा उता–यात शेत सर्वे क्र. ४९९ चे विहीर मोटरपंपावर शेत सर्वे क्र. ५१५ चा ५० पैसे हक्क हा शेरा विक्रीपत्र दस्त क्र. ६७३/२०१४ नुसार घेण्यात आले असे दिसुन येते. संमतीपत्र, तडजोडपत्र, विक्रीपत्रातील सातबारे तसेच शेत सर्वे क्र. ४९९ चा सातबारा यावरुन शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीत व मोटरपंपावर प्रतिवादी रमेश बारई यांचा केवळ ३३ पैसे हक्क होता असे

दिसुन येते. "Nemo dat quod non habet" (No one can transfer a better title than what he himself has) या लिगल मॅक्झीम प्रमाणे कोणत्याही व्यक्तीचा ज्या वस्तुवर त्याचा मालकी हक्क नाही ती वस्तु इतर कोणालाही हस्तांतरीत करु शकत नाही. त्यामुळे प्रतिवादीला शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये संपुर्ण किंवा किमान ५० टक्के हक्क नसतांना सदर विहीरीवरील ५० टक्के हक्क वादीला हस्तांतरीत करु शकत नाही. त्यामुळे २३.०६.२०१४ रोजीच्या विक्रीपत्रान्वये प्रतिवादी रमेश बारई हे वादीला सर्वे क्र. ४९९ मध्ये त्याचा नसलेला ५० टक्के हक्क हस्तांतरीत करु शकत नाही. त्याचप्रमाणे विक्रीपत्रासोबत दाखल केलेल्या दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता शेत सर्वे क्र. ५१५ ला शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीवर ओलीताचा हक्क असल्याचे नमुद केलेले नाही. त्यामुळे देखील वादीला शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीवर ओलीताचा हक्क आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादीच्या बाजुने सकृतदर्शनी केस आहे असे म्हणता येणार नाही.

१३. वादीचे शेतीचे मुळ मालक सुरेश ढबाले किंवा रमेश बारई यांना शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये पूर्ण किंवा ५० पैसे हक्क नसतांना तो हक्क ते वादीला हस्तांतरीत करु शकत नाही. शेत सर्वे क्र. ४९९ मध्ये गजानन ढबाले व रंजना ढबाले यांचा प्रत्येकी ३३ पैसे ओलीताचा हक्क आहे. वादीला सदर विहीरीत विक्रीपत्राप्रमाणे ५० टक्के ओलीताचा हक्क दिल्यास गजानन ढबाले व रंजना ढबाले यांच्या हक्कास बाधा पोहोचेल. वादी शेत सर्वे क्र. ५१५ खरेदी केल्यापासून त्याच्या ताब्यात असून शेत सर्वे क्र. ४९९ मधून ओलीत करुन पीक घेत आहे याबाबत सन २०१४ ते २०१७ पर्यंतचे कोणतेही दस्ताऐवज किंवा सातबारा उतारे दाखल केलेले नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी तसेच गजानन ढबाले व रंजना ढबाले हे वादीला शेत सर्वे क्र. ४९९ मधील विहीरीतून ओलीताकरीता पाणी घेण्यास कधीही मनाई केली नाही याबाबत वादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अशापरिस्थीतीत सोयीचे पारडे वादीच्या बाजुने नाही. तसेच वादीचे अपरिमित नुकसान होईल हे वादीने सिध्द केलेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत

आहे.

<u>मुद्दा क्र. ४ करिता</u>

१४. एकंदरीत वरील विवेचनावरुन सुकृतदर्शनी केस ही वादीच्या बाजुने नाही. त्यामुळे तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार तसेच सोयीचे पारडे देखील वादीच्या बाजुने आहे हे वादीने सिध्द केले नाही. अशा परिस्थितीत त्यामुळे वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकुम पारीत करणे योग्य होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

ठिकाणः कारंजा घा.
दि. २३.०३.२०२१

(मंजुषा एम. अलोणे)
दिवाणी व फौजदारी न्यायाधीश,
कारंजा घा.